# नियमीत दिवाणी मुकदमा क्र. ११/२०१३ मधील निशाणी क्र. ५ वर आदेश

१. सदरचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ खालील तरतुदींनुसार प्रतिवादींविरूध्द तात्पुरता मनाई आदेश पारित करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, मौजे कान्हापुरी, ता. पंढरपूर येथील गट क्र. ३४५ क्षेत्र २१ हे. २७ आर. ची जमीन वादी व प्रतिवादींचे पुर्वज रामकिसन गंगाराम भुई यांना वहिवाटून उत्पन्न घेण्यासाठी शासनाकडून मिळालेली असून सदर रामकिसन यांना ५ मुले होती. सदर रामकिसनचा मुलगा सिताराम मयत झाल्यानंतर सितारामचे वारस व भाऊ वडिलार्जित जमिनीला नोंद लावण्यासाठी अर्ज दिल्यामुळे फेरफार क्र. १२४ ने नोंदी झाल्या. तसेच फेरफार क्र. ३२९ ने देखील दि. ०७/०६/१९८४ रोजी वारसांच्या नोंदी करण्यात आल्या आहेत. सदर नोंदीबाबत प्रतिवादी क्र. १ चे सासरे व प्रतिवादी क्र. २ व ३ चे वडील सुखदेव यांनी मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे दुसरे अपील क्र. ०२/८७ दाखल केले. सदरचे अपील दि. २८/०२/१९८९ रोजी नामंजूर करण्यात आले. १६ वे पंढरपूर येथील मा. उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयातील आर.टी.एस. क्र. १२८/८४ मधील आदेश कायम केला. तेव्हा सदर प्रकरणातील वादी क्र. १ ही अर्जात नमूद केल्याप्रमाणे अर्जात नमूद गट क्र. ३४५ पैकी १७ आर. क्षेत्रात वहिवाट करीत असून वादी क्र. २ व त्यांचे पुर्वज सदर मिळकतीपैकी अर्जात नमूद केल्याप्रमाणे १८ आर. क्षेत्र वहिवाटीत आहेत.

तसेच वादी क्र. ३, ४ व जालिंदर भुई हे सामाईकात अर्जात नमूद केल्याप्रमाणे १८ आर. क्षेत्रात वहिवाट करीत आहेत. तसेच वादी क्र. ५ बाबुराव भुई हे अर्जात नमूद केल्याप्रमाणे १८ आर. क्षेत्रात वहिवाट करीत आहेत. तसेच वादी क्र. ६ यांना ०.०६ आर. क्षेत्र, बापू भुई व मोहन भुई यांना प्रत्येकी ०.०३ आर. क्षेत्र येत आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना सामाईकात ०.०६ आर. क्षेत्र सुखदेव भुईचे वारस या नात्यातून येत आहे. अशी वस्तुस्थिती असताना सुखदेव भुई यांनी तहसीलदार, पंढरपूर यांच्याकडे चुकीच्या पध्दतीने वाटपासाठी अर्ज देऊन गट क्र. ३४५ चे ८९ आर. क्षेत्र वहिवाटीत असल्याचे दर्शविलेले आहे. सदर वाटपाबाबतची नोंद चुकीच्या पध्दतीने दाखल झालेली आहे. त्याबाबत वादींना कोणत्याही प्रकारची नोटीस मिळालेली नाही. सदर वाटपाबाबतची फेरफार क्र. १२०५ ची नोंद रद्द होण्याकरीता वादींनी उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांच्याकडे अपील दाखल केल्याचे प्रतिवादींनी मनात राग धरून अर्जात नमुद मिळकतीमधील वादींच्या वहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत व अर्जात नमूद केल्याप्रमाणे असलेल्या मिळकतीच्या पट्या संपुष्टात आणण्याचा प्रयत्न चालविला आहे. त्याबाबत प्रतिवादींना वादींनी सांगण्याचा प्रयत्न केला असता प्रतिवादी ऐकण्याच्या मन:स्थितीत नाहीत. त्यामुळे सदरचा अर्ज व दावा वादींना दाखल करणे भाग पडले आहे. सदर प्रकरणातील वादींनी शेवटी अर्जात नमूद मिळकतीमधील वादीच्या वहिवाटीस प्रतिवादींनी हरकत अडथळा करू नये व बांध नष्ट करू नये असा तात्पुरता मनाई आदेश पारित करण्याची विनंती केली आहे.

२. सदर अर्जाला प्रतिवादींनी **<u>नि.क्र. २७</u>** ला म्हणणे देऊन अर्जातील कथन स्पष्टपणे नाकारलेले आहे. सदर म्हणण्यातील थोडक्यात कथन असे आहे की, अर्जात नमूद मिळकतीचे वर्णन चुकीचे असून काल्पनिक स्वरूपाचे आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादींची वहिवाट नव्हती व त्याबाबत महसूल दप्तरी नोंद झालेली नाही. तसेच दाव्यात नमूद वंशावळ देखील बरोबर नाही. तसेच अर्जात नमूद मिळकत कोणास, केव्हा, कशी मिळाली याचा उल्लेख नाही. तसेच अर्जात नमूद मिळकतीमध्ये कोणाचे किती हिस्से आहेत व हिस्से कसे झाले हे नमूद नाही. फेरफार क्र. १२४ ही प्रतिवादींच्या पुर्वाधिकाऱ्यांच्या वारसांबाबत नोंद असून वहिवाटीची नाही. तसेच वहिवाटीबाबत कागदोपत्री कुठेही नोंद झाली नसल्याचा फेरफार क्र. १२०५ च्या नोंदीवरून स्पष्ट होते. सदर अर्जाला खोटे कारण नमूद करून प्रस्तुतचा दावा व अर्ज दाखल केला आहे. तसेच प्रतिवादींनी केव्हा व कशा प्रकारची हरकत केली याचा अर्जामध्ये उल्लेख नाही. वादींना सकृतदर्शनी केस नसून न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने नाही. वादींचा अर्ज मोघम स्वरूपाचा असून अर्जात नमूद केल्याप्रमाणे तात्पुरता मनाई आदेश पारित केल्यास प्रतिवादींचे अपरिमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची प्रतिवादींनी शेवटी विनंती केली आहे.

३. सदर प्रकरणातील अर्जामधील व म्हणण्यामधील कथन विचारात घेऊन सदरचा अर्ज निकाली काढण्याकरीता मी खालील

मुद्दे विचारात घेतलेले आहेत. सदर मुद्दयांना कारणासहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | अर्जात नमुद मागणीबाबत प्रथमदर्शनी केस वादींच्या लाभात असल्याचे वादी सिध्द करतात का ? | : | ..नाही. |
| २ | अर्जात नमुद मागणीबाबत न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने असल्याचे वादी सिध्द करतात का ? | : | ..नाही. |
| ३ | सदरचा अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे अपरिमीत हानी होणार असल्याचे वादी सिध्द करतात का ? | : | ..नाही. |
| ४ | काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

४. सदर प्रकरणामध्ये वादींतर्फे विद्वान वकील श्री. जे. एम. पाटील व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. एस.आर. जोशी—बार्डीकर यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

**<u>मुद्‌दा क्र. १ ते ३ करीता</u>** :—

सदर मुद्‌दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे कारणमीमांसेकरीता व निष्कर्षाकरिता सदर मुद्‌दे एकत्रीत घेण्यात आलेले आहेत.

५. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरून आणि दोन्ही बाजुंच्या विद्वान वकिलांच्या युक्तिवादावरून सर्वप्रथम याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदरचा दावा वादींनी दावा मिळकतीची मालकी व वहिवाट दाव्यासोबत असलेल्या नकाशाप्रमाणे असल्याचे ठरवून मिळण्याकरीता व निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. सदर प्रकरणातील वादींनी अर्जामध्ये वादींची गट नंबर ३४५ क्षेत्र २१ हे. २७ आर. मध्ये वेगवेगळी वहिवाट असल्याचे नमूद केलेले आहे. तसेच वादींची वहिवाट अर्जात नमूद चतु:सिमेप्रमाणे वेगवेगळी असल्याचे चतु:सिमेसह नमूद केलेले आहे. त्यामुळे सदर अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादींची वेगवेगळी वहिवाट असल्याचे वादींनी प्रथमदर्शनी सिध्द केले आहे का ? हे पहाणे जरूरीचे आहे. सदर प्रकरणातील वादींनी अथवा प्रतिवादींनी अर्जात नमूद मिळकतीबाबत दावा दाखल करतेवेळीचा म्हणजेच सन २०१३ चा ७/१२ उतारा प्रकरणामध्ये दाखल केलेला नाही. तसेच सदर प्रकरणातील वादींनी <u>नि.क्र. ४</u> सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांवरून याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदर <u>नि.क्र. ४/१</u> कडील ७/१२ उतारा कोणत्या सालाबाबत आहे हे स्पष्ट दिसून येत नाही.

तसेच सदर ७/१२ उतारा हा गट क्र. ३४५/१ बाबत असून सदरचा अर्ज गट क्र. ३४५ बाबत आहे. त्यामुळे सदर ७/१२ उताऱ्यामधील मिळकतीची अर्जात नमूद मिळकतीशी काही संबंध असल्याबाबत वादींनी स्पष्ट केलेले नाही. तसेच नि.क्र. ४/२ सोबत दाखल असलेला ७/१२ उतारा हा सन १९८४—८५ या सालाचा असल्याचे दिसून येत असून सदर ७/१२ उताऱ्याच्या नोंदीवरून याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदर ७/१२ उताऱ्यामध्ये मालक सदरी 'सरकारी' असे नमूद असून सदर उताऱ्यामधील क्र. १२ च्या रकान्यामध्ये वादी व प्रतिवादींच्या पुर्वजांचे वेगवेगळया क्षेत्रामध्ये पीकपाणी सदरी नावं दाखल असल्याचे दिसून येते. परंतु सदर अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादींची चतु:सिमेप्रमाणे वेगळी वहिवाट असल्याचे सदर उताऱ्यावरून दिसून येत नाही. तसेच त्याबाबत वादींनी कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. तसेच सदर अर्जात नमूद गट क्र. ३४५ ची मिळकत वादी व प्रतिवादींचे पुर्वज रामकिसन भुई यांना शासनाकडून मिळाल्याबाबत कोणतीही कागदपत्रे सद्य परिस्थितीमध्ये वादींनी दाखल केलेली नाहीत. तसेच अर्जात नमूद मिळकतीबाबत कागदोपत्री कशा प्रकारच्या नोंदी आहेत हे दाखविण्याकरीता वादींनी दावा दाखल करतेवळीचा अथवा सध्याचा ७/१२ उतारा दाखल केलेला नाही. त्यामुळे दावा दाखल करतेवेळी व सध्या अर्जात नमूद मिळकतीबाबत ७/१२ उताऱ्यासदरी काय परिस्थिती आहे ही समोर आलेली नाही.

६. तसेच सदर प्रकरणातील वादींनी अर्जात नमूद चतु:सिमेप्रमाणे अर्जात नमूद मिळकतीमध्ये वेगवेगळी वहिवाट असल्याचे

दर्शविण्याकरीता सद्य परिस्थितीमध्ये अर्जात नमूद कथनाव्यतिरिक्त इतर कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. अर्जात नमुद फेरफार क्र. १२४ व ३२९ मधील नोंदीवरून अर्जात नमूद चतु:सिमेप्रमाणे अर्जात नमूद मिळकतीमध्ये वेगवेगळी वहिवाट असल्याचे प्रथमदर्शनी सद्य परिस्थितीमध्ये दिसून येत नाही. तसेच अर्जात नमूद केल्याप्रमाणे अर्जात नमूद मिळकत म्हणजेच गट क्र. ३४५ मधील काही क्षेत्र वादी व प्रतिवादींच्या पुर्वजांना शासनाकडून मिळाल्याचे युक्तिवादाकरीता गृहीत धरले तरी अर्जात नमूद मिळकतींचे वादी व प्रतिवादींच्या पुर्वजांमध्ये अथवा वादी व प्रतिवादींमध्ये वाटप झाल्याबाबत कोणतीही कागदपत्रे वादींनी प्रकरणामध्ये दाखल केलेली नसल्याने अर्जात नमूद चतु:सिमेप्रमाणे अर्जात नमूद मिळकतीमध्ये वेगवेगळी वहिवाट असल्याचे निष्कर्ष सद्य परिस्थितीमध्ये नोंदविता येत नाही. याउलट सदर प्रकरणातील वादी व प्रतिवादींनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरून अर्जात नमूद मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावरील नोंदीबाबत महसूल विभागाकडे प्रकरणे चालू असल्याचे स्पष्ट होते.

७. सदर प्रकरणातील वादींनी सदर अर्ज दाखल केलेला असल्यामुळे अर्जात नमूद चतु:सिमेप्रमाणे वादींची वेगवेगळी वहिवाट असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द करण्याची जबाबदारी वादींवर आहे. परंतु त्या अनुषंगाने वादींनी कोणतीही कागदपत्रे अथवा इतर पुरावा सद्य परिस्थितीमध्ये दाखल केलेला नाही. तसेच सदर प्रकरणातील वादींची अर्जात नमूद चतु:सिमेप्रमाणे वेगवेगळी वहिवाट असल्याचे प्रकरणात दाखल कोणत्याही कागदावरून प्रथमदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे सद्य परिस्थितीमध्ये

अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादींची अर्जात नमूद चतु:सिमे प्रमाणे वेगवेगळी वहिवाट असल्याचे व वहिवाटीदरम्यान बांध असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर प्रकरणात वादींनी अर्जात नमूद चतु:सिमेप्रमाणे वहिवाट असल्याबाबतची प्रथमदर्शनी केस वादींच्या बाजुने असल्याचे वादींनी सिध्द केलेले नाही. तसेच सद्य परिस्थितीमध्ये वादींनी अर्जात नमूद चतु:सिमेप्रमाणे वेगवेगळी वहिवाट असल्याचे दर्शविण्याकरीता कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाही. त्यामुळे अर्जातील मागणीबाबत न्यायाचा समतोल देखील वादींच्या बाजुने असल्याचे वादींनी सिध्द केलेले नाही. याउलट अर्जातील कथनावरून अर्जात नमूद गट क्र. ३४५ ची मिळकत वादी व प्रतिवादींच्या पुर्वजांच्या मालकीची असल्याचे युक्तिवादाकरीता गृहीत धरल्यास अर्जात नमूद मिळकतींचे वादी व प्रतिवादींच्या पुर्वजांमध्ये अथवा वादी व प्रतिवादींमध्ये वाटप झाल्याचे सिध्द झाल्याशिवाय वादींची अर्जात नमूद केल्याप्रमाणे वेगवेगळी वहिवाट असल्याचा निष्कर्ष नोंदविता येत नाही. सदर प्रकरणातील वादींनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे मिळकतीचे वाटप झाल्याबाबत कोणतीही कागदपत्रे प्रकरणात दाखल केलेली नाहीत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर केल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होणार असल्याचे देखील वादींनी सिध्द केलेले नाही. त्यामुळे वर नमूद चर्चेवरून आणि सदर प्रकरणातील कागदपत्रावरून माझे असे मत झाले आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ खालील तरतुदींनुसार तात्पुरता मनाई आदेश पारित करण्यासाठी लागणारे घटक प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समतोल आणि अपरिमीत हानीचा मुद्दा वादींच्या बाजुने असल्याचे वादींनी

सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे मी **<u>मुद्दा क्र. १ ते ३</u>** ला **<u>'नकारार्थी'</u>** निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u>** :—

८. वर नमूद चर्चा व सदर प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट होते की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ खालील तरतुदींनुसार तात्पुरता मनाई आदेश पारीत करण्यासाठी लागणारे महत्वाचे घटक वादींनी सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## ***<u>आदेश</u>***

१. नि.क्र. ५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात आला.

सही/—

दिनांक — १९/११/२०१४

( शि. म. गौरगोंड )

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर.